# <u>प्रेसनोट</u>

नाशिक,
दि. ०३/०६/२०२२

**आलोसे अमोल खंडेराव घुगे, शाखा अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद नाशिक, जि.नाशिक यांना १,५०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक करून त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | कार्यवाही सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | अमोल खंडेराव घुगे, शाखा अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद नाशिक, जि.नाशिक. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १,९०,०००/— रूपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | **१,५०,०००/— रूपये तडजोडीअंती** |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार हे शासकीय स्थापत्य कंत्राटदार (ठेकेदार) असून त्यांनी मौजे पाथरे, ता.सिन्नर, जि.नाशिक येथे नळ पाणी पुरवठयाचे काम नियमानुसार पूर्ण केले असून सदर कामाचे ४८,००,०००/—रुपयांचे देयक (बिल) हे तयार करुन ते मंजुर करुन दिल्याचे मोबदल्यात आलोसे अमोल खंडेराव घुगे, शाखा अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांनी सदर देयकाचे ४ % प्रमाणे १,९०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे अमोल खंडेराव घुगे, शाखा अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांनी तक्रारदार यांच्याकडून मंजुर देयकाचे ४ % प्रमाणे १,९०,०००/— रुपये लाचेची मागणी केली व तडजोडीअंती ३ % प्रमाणे १,५०,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आज दि.०३/०६/२०२२ रोजी पंच व साक्षीदार यांचे समक्ष ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद नाशिक कार्यालयात **स्विकारली** असता त्यांना पकडण्यात आल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई—मेल :— spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स अॅपक्र :— ९९३०९९७७००

(सतिश भामरे)
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.